राज्य क्रीडा धोरण- सन २०१२

राष्ट्रीय स्तरावर शालेय, ग्रामीण (पायका) व महिला क्रीडा स्पर्धेत सहभागी राज्यातील खेळाडूंच्या शिष्यवृत्तीत वाढ व आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी शिष्यवृत्ती लागू करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो २०१२/(प्र.क्र.१४५/१२)/क्रीयुसे-२,**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,**

तारीख: ४ जुलै, २०१३

**वाचा —**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक -अताप्र-१००८ / प्र.क्र.४२८ / ०८ / क्रीयुसे-२, दिनांक २२ मार्च,२०१०

**प्रस्तावना —**

राज्यात तालुका ते राष्ट्रीय स्तरावर भारतीय शालेय खेल महासंघ यांच्यावतीने शालेय खेल स्पर्धा, तसेच भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या महिला व ग्रामीण (पायका) क्रीडा स्पर्धा यांचे आयोजन क्रीडा व युवकसेवा संचालनालय करते.

सद्य:स्थितीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये प्राविण्य (प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक प्राप्त) मिळविलेल्या व सहभागी खेळाडूला वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते. हे दर दिनांक २२ मार्च, २०१० च्या शासन निर्णयाद्वारे निश्चित केले आहे. दरम्यान राज्याचे क्रीडा धोरण सन २०१२ घोषित झाले असून यातील मुद्दा क्रमांक ३.५ मध्ये प्रचलित शिष्यवृत्तीमध्ये दर तीन वर्षांनी २५ टक्क्यांनी वाढ करण्यात येईल असे नमूद आहे. या पार्श्वभूमीवर खेळाडूंना अधिक प्रोत्साहन मिळण्यासाठी सध्याच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय—

सन २०१३-१४ पासून राष्ट्रीय शालेय, ग्रामीण (पायका) व महिला क्रीडा स्पर्धेमध्ये राज्याच्या संघातून सहभाग घेणा-या व प्राविण्य मिळविणा-या खेळाडूंना पुढील प्रमाणे सुधारित शिष्यवृत्ती देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे :-

***राष्ट्रीय* स्तर**

| अ. क्र. | प्राविण्य | सध्याच्या योजनेनुसार वार्षिक शिष्यवृत्ती रक्कम | सुधारित योजनेनुसार वार्षिक शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रथम क्रमांक | ९,००० | ११,२५० |
| २ | द्वितीय क्रमांक | ७,२०० | ८,९५० |
| ३ | तृतीय क्रमांक | ५,४०० | ६,७५० |
| ४ | सहभाग | ३,००० | ३,७५० |

सन २०१३-१४ पासून आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतील सहभाग व प्राविण्य प्राप्त राज्यातील खेळाडूंना खालील प्रमाणे शिष्यवृत्ती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

***आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा***

| अ.क्र. | प्राविण्य | प्रचलित वार्षिक शिष्यवृत्ती रक्कम | सुधारित योजनेनुसार वार्षिक शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रथम क्रमांक | २४,००० | ३०,००० |
| २ | द्वितीय क्रमांक | १८,००० | २२,५०० |
| ३ | तृतीय क्रमांक | १२,००० | १५,००० |
| ४ | सहभाग | ९,००० | ११,२५० |

३. उपरोक्त परिच्छेदातील सुधारित शिष्यवृत्ती मंजूर करताना शासन निर्णय दिनांक २२ मार्च,२०१० च्या परिच्छेद-३ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

४. खेळाडूंना शिष्यवृत्ती देण्याच्या योजनेकरिता होणारा खर्च "२२०४-क्रीडा व युवकसेवा- १०४- क्रीडा व खेळ (०९) (०१) क्रीडा नैपुण्य शिष्यवृत्त्या ३४ शिष्यवृत्त्या/विद्यावेतने (२२०४ १६६ ७) योजनेतर" या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा. या प्रयोजनार्थ संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक -अनौसं १८८/व्यय-५, दिनांक २८.२.२०१३ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७०४१५०८२०१०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2013.07.05 15:05:42 +05'30'

**( रा. चं. पाटील )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
५. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,
६. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
९. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व जिल्हाधिकारी,
१३.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

१४.सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा,

१५.जिल्हा माध्यमिक शिक्षण अधिकारी (सर्व),

१६.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी,

१७.मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,

१८. मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,

१९. सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

२०. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

२१.निवड नस्ती (क्रीयुसे-२)